# उप वनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालय.

विषय– ट्रक / ट्रॅक्टर द्वारा बिट, लांबबांबु व बांबु बंडल्स वाहतुकी करीता दर निश्चितीस निवीदा सुचनांची जाहिरात प्रकाषीत करणे बाबत.
कमांक–कक्ष–3(4)/राजस्व/
आलापल्ली, दिनांक –

प्रति,
संचालक,
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नागपूर विभाग, जुने सचिवालय,
नागपूर.

ट्रक / ट्रॅक्टर द्वारा बिट, लांबबांबु व बांबु बंडल्स वाहतुकीचे दर मागणी करून निश्चितीकरीता मागविण्यात येणा–या निवीदा सुचनाची जाहिरात सोबतच्या परिशिष्टाप्रमाणे पाठविण्यांत येत आहे. तरी आपणास विनंती आहे की, सोबतची जाहिरात खालील दर्शविण्यात तपशिलाप्रमाणे तिन कॉलम मध्ये कमीत कमी जागेत लहान अक्षरांचा वापर करून फक्त एकदाच प्रकाशनासाठी द्यावी, हि विनंती. या पेक्षा जास्त वृत्तपत्रातून जाहिरात प्रकाशित झाल्यास देयकाची रक्कम अदा करण्यांस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | कार्यालयाचे नांव | : | उप वनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली<br>दुरध्वनी कमांक– 07133/266433 |
| 2. | प्रकाशन | : | प्रादेशिक (3 कॉलम मध्ये कमीत कमी जागेत लहान अक्षरांचा वापर करून) |
| 3. | जाहिरातीची भाषा | : | विभागीय स्तरावर<br>1) मराठी दैनिक – (नागपूर येथून प्रकाशित होणारे लोकसत्ता दैनिक वृत्तपत्रातून ) |
| 4. | वर्तमान पत्रात प्रकाशनाची वेळ | : | फक्त एकदाच. |
| 5. | जाहिरातीची अंतिम तारीख | : | 21/1/2011 |
| 6. | जाहिरातीचे देयके शोधनासाठी कोणाकडे पाठवावे. | : | जाहिरातीचे देयके अग्रिम मुद्रांक पावती व जाहिरातीचे कागदपत्रासह उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालयात शोधनासाठी पाठवावे. |

**सहपत्र –** जाहिरात मराठी
(3 प्रतित)

उप वन संरक्षक
आलापल्ली वनविभाग आलापल्ली

**प्रतिलीपी– सहपत्रासह**

(1) वनसंरक्षक, गडचिरोली वनवृत्त, गडचिरोली यांना माहितीस सविनय सादर.
(4) उपविभागिय वन अधिकारी/सहा. वनसंरक्षक (तेंदुपाने),/ पकाष्ठ निष्कासन अधिकारी, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांना माहिती व पुढील कार्यवाहीस अग्रेषित.
(5) वनपरिक्षेत्र अधिकारी, (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीस रवाना.
(6) वनपरिक्षेत्र अधिकारी , प्रकाष्ठ घटक, आलापल्ली यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस रवाना.
(7 ) ''सुचना फलक

# महाराष्ट्र शासन
# आलापल्ली वनविभाग, आलापल्ली
# ट्रक/ट्रक्टरद्धारे बीट, लांबबांबु व बांबु बंडल्स वाहतुकीबाबत निवीदा सुचना

==============================================

आलापल्ली वनविभागातील सन १०११ मध्ये विभागीययरित्या कुपातील उत्पादीत होणारे बीट, लांबबांबु व बांबु बंडल्स कुप डेपो ते विक्री डेपोपर्यंत वाहतुक करण्यास प्रती बीट, प्रती बांबु व प्रती बांबु बंडल्स प्रमाणे इच्छुक वाहतुकदारांकडून मोहरबंद निवीदा मागविण्यात येत आहे. वाहतुक करावयाच्या बीट, लांबबांबु व बांबु बंडल्स कुपनिहाय अंदाजीत उपलब्धता कुप क्रमांक / खंड क्रमांक, वाहतुकीचे अंतर इत्यादी सविस्तर तपशील निवीदा फार्म सोबत उपलब्ध राहील.

## वाहतुक करावयाचा बीट, लांबबांबु व बांबु बंडल्सचा तपशील

================================

| अ.क्र. | वनविभागाचे नांव | विवरण | वनोपज वाहतुक करावयाच्या विक्री आगाराचे नांव | वाहतुक करावयाचे वनोपजाची अंदाजीत मात्रा |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | आलापल्ली | विभागीयरित्या कुपातून उत्पादीत होणारे बीटे. | आलापल्ली (खसरा) विक्री डेपो आलापल्ली | १८७५५ बीटे |
| २ | आलापल्ली | विभागीयरित्या कुपातून उत्पादीत होणारे बीटे. | घोट विक्री आगार, घोट | २४९९ बीटे |
| ३ | आलापल्ली | विभागीयरित्या कुपातून उत्पादीत होणारे लांबबांबु व बांबु बंडल्स (नग) | आलापल्ली सॉमील विक्री डेपो, आलापल्ली | २७०००० लांबबांबु<br>२७००० बांबु बंडल्स |
| ४ | आलापल्ली | विभागीयरित्या कुपातून उत्पादीत होणारे लांबबांबु व बांबु बंडल्स (नग) | घोट विक्री आगार, घोट | ३३७००० लांबबांबु<br>३३७०० बांबु बंडल्स |
| ५ | आलापल्ली | जं.का.स. संस्था मार्फत कामे करण्यात येणाऱ्या कुपातून उत्पादीत होणारे लांबबांबु व बांबु बंडल्स (नग) | घोट विक्री आगार, घोट | ६८९२ बीटे |

१) निवीदा फार्मची किंमत रु. ५००/- (प्रती फार्म) नापरतावा राहील.

२) आलापल्ली वनविभागातील शासकियरित्या उत्पादीत केलेले बीट, लांबबांबु व बांबु बंडल्स तसेच जं.का.स. संस्था मार्फत उत्पादीत बीट वाहतुकीकरीता निवीदा फार्म विक्री दिनांक १३/१/२०११ ते २७/१/२०११ पर्यंत कार्यालयीन वेळेत व दिनांक २८/१/२०११ ला दुपारी १२.०० वाजेपर्यंत रोखीने रु. ५००/- भरणा करुन वनपरिक्षेत्र अधिकारी, प्रकाष्ट घटक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालयात मिहतील.

३) आलापल्ली वनविभागातील बीट, लांबबांबु व बांबु बंडल्स वाहतुकीच्या मोहरबंद निवीदा दिनांक २८/१/२०११ रोजी सकाळी ११.०० वाजेपासुन ते १४.०० वाजेपर्यंत उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे कार्यालयात स्विकारण्यात येईल व त्याच दिवशी दुपारी १५.०० वाजता उपस्थित निवीदा धारकांचे समक्ष उघडण्यात येतील.

४) आलापल्ली वनविभागातील बीट, लांबबांबु व बांबु बंडल्स वाहतुकीचे प्रत्येक निवीदा फार्मसोबत रु. ५०००/- (पांच हजार) चा कोणत्याही राष्ट्रीयकृत बँकेचा धनाकर्ष (डी.डी.) उपवनसंरक्षक, आलापल्ली वनविभाग, आलापल्ली यांचे नावाने चंद्रपूर शाखेवर देया होणारा जोडणे आवश्यक आहे.

५) निवीदा फार्ममध्ये कुप निहाय बीट, लांबबांबु व बांबु बंडल्स दर अक्षरी व आकड्यात स्पष्ट नमुद करावे.

६) किमान ५ वाहन (ट्रक/ट्रॅक्टर) चे रजिस्ट्रेशन स्वत:ाचे नावाने असलेल्या व आयक रजिस्ट्रेशन व मागील वर्षापर्यंत अद्यावत आकराचे विवरणपत्र दाखल केलेल्या वाहतुकदारांनीच निवीदा फार्म भरावे व तसा उल्लेख निवीदा फार्ममध्ये करावा.

७) महाराष्ट्र शासनाचे सर्व कायद्याचे व नियमाचे पालन करण्याची जबाबदारी संबधीत वाहतुकदाराची राहील.

८) निवीदामध्ये दर्शविण्यात आलेल्या बीट, लांबबांबु व बांबु बंडल्सची मात्रा अंदाजीत असुन त्यामध्ये वाढ किंवा घट होऊ शकते.

९) कोणत्याही वा सर्व निवीदा वा त्यातील भाग कोणत्याही प्रकारे कारण न दर्शविता रद्द करण्याचा अधिकार निवीदा मागणी करणारे संबंधीत उपवनसंरक्षक यांनी स्वत:कडे राखुन ठेवलेले आहेत.

१०) वाहतुकी संबंधीच्या सविस्तर अटी व शर्ती मान्य असल्याबाबत स्वाक्षरीकरुन निवीदा फार्म सोबत जोडावे.

११) वाहतुक दारांनी परिवहन विभागाचे नियमानुसार वनउपजाची वाहतुक करावी लागेल.

आलापल्ली, जिल्हा - गडचिरोली (म.रा.)
दुरध्वनी क्रमांक :- ०७१३३/२६६४३३

उपवनसंरक्षक,
आलापल्ली वनविभाग, आलापल्ली

D:\Rev-२०११\Transporting Add..doc